


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३७६ वा गुरूवार दि २८ मे २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# राष्ट्रवादीला पुन्हा अर्थखातं मिळावं, सुनेत्रा पवारांकडून अपेक्षा व्यक्त? फडणवीसांनी मौन सोडलं, अशी कोणतीही मागणी...

**वृत्तसंस्था नवी दिल्ली**

विधान परिषदेचा आमचा कठीण पेपर पूर्णपणे सुटला असून आता फक्त सोपा पेपर शिल्लक आहे. फक्त टीकमार्क करायची आहे. तो प्रश्न आम्ही सोडवू आणि मुंबईत अंतिम निर्णय घेऊ,फ अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी राजधानी दिल्लीत दिली. राष्ट्रवादीच्या बैठकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रवादीला पुन्हा एकदा अर्थखाते मिळाले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केल्याच्या चर्चांवरही फडणवीसांनी मौन सोडले. सूत्रांच्या माहितीनुसार भाजप १० ते ११, शिवसेना पाच ते सहा आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) दोन असा सर्वसाधारण फॉर्म्युला समोर आला आहे. मात्र, शिवसेना (उबाठा) आणि महाआघाडीचे, सध्याच्या विधानसभेतले घटलेले संख्याबळ पाहता विरोधकांच्या हमखास जागांवरही महायुतीचेच उमेदवार निवडून यावेत या दृष्टीने भाजप पावले टाकीत आहे. शहा यांच्या काही मिनिटांच्या सूचनेनंतर विधान परिषद जागा वाटपाचा मुद्दा संपल्याचे चित्र स्पष्ट झाले. याचा अंतिम निर्णय आज, गुरुवारी दिवसभरात मुंबईमध्ये तिन्ही पक्षांचे नेते जाहीर करण्याची शक्यता आहे. शिवसेनेचे भरत गोगावले आणि राष्ट्रवादीचे सुनील तटकरे हे आपापल्या मुलांसाठी कोकणच्या जागेसाठी आग्रही आहेत. सध्या तीनच जागांचा प्रश्न शिल्लक आहे, बाकी जागांचा विषय संपलेला आहे, अंतिम निर्णय मुंबईत होईल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि कोकण या तीनच जागांसाठीचा तिढा असल्याचे मुख्यमंत्र्यांनीही मान्य केले. राष्ट्रवादी काँग्रेस आमची पुण्याची जागा मागत आहे हे मुख्यमंत्र्यांनी आवर्जून सांगितले. मागच्या विधान परिषद निवडणुकीत १७ पैकी सात जागा भाजपने जिंकल्या होत्या. मात्र, दरम्यानच्या काळात राजकीय संख्याबळाची स्थिती प्रचंड प्रमाणात बदलली. परिणामी भाजपने आपल्या संख्याबळानुसार बारा जागांवर लढण्याची तयारी केली. भाजप आणि शिवसेनेत सुरू असलेल्या रस्सीखेचित राष्ट्रवादीचीही भर पडली. कालपर्यंत एक जागेसाठी मागणी करणाऱ्या राष्ट्रवादी




काँग्रेसने आता ही संख्या तीनपर्यंत वाढवली. आम्ही तीन जागा मागितल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिल्लीत सांगितले. राष्ट्रवादीच्या बैठकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रवादीला पुन्हा एकदा अर्थखाते मिळाले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. त्याबाबत विचारले असता, माझ्यापर्यंत अद्याप तरी अशी कोणती मागणी आलेली नाही. ती जेव्हा येईल तेव्हा मी बोलेन असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

# शिवसेना, एनसीपी नंतर आणखी एक मोठा पक्ष फुटणार? २० खासदार, ५० आमदार भाजपच्या वाटेवर असल्याचा दावा

**वृत्तसंस्था कोलकाता**

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात उभी फूट पडल्यानंतर आता आणखी एक मोठा पक्ष फुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पश्चिम बंगालमध्ये तब्बल १५ वर्षे सत्तेत राहिलेल्या तृणमूल काँग्रेसमध्ये सध्या सारं काही आलबेल नाही. राज्यात पहिल्यांदाच भारतीय जनता पक्षाची सत्ता आल्यावर तृणमूल काँग्रेसमध्ये अस्वस्थता आहे. आमदार, खासदारांना सत्तेसोबत जाण्याची गरज वाटू लागली आहे. मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी बोलावलेल्या बैठकीला बारासातच्या खासदार काकोली घोष दस्तीदार उपस्थित होत्या. त्यांच्या सोबत तृणमूलचे सहा आमदारदेखील बैठकीला हजर होते. माजी मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांच्या निकटवर्तीय मानल्या जाणाऱ्या काकोली घोष यांनी बुधवारी पक्षातील सर्व पदांचा राजीनामा दिला. याआधी घोष यांनी बारासातच्या जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. यानंतर भाजपचे वरिष्ठ नेते आणि बांकुडचे खासदार सौमित्र खान यांनी सनसनाटी दावा केला आहे. तृणमूल काँग्रेस चे जवळपास ५० आमदार आणि २० खासदार भाजपमध्ये येण्यास तयार आहेत. आमदार, खासदार भाजपच्या संपर्कात असून नेतृत्त्वाकडून हिरवा कंदील मिळताच पक्षांतर करतील, असा खळबळजनक दावा खासदार सौमित्र खान यांनी केला. भाजपच्या केंद्रीय नेतृत्त्वानं जर का एकदा ठरवलं, तर तृणमूल काँग्रेस नावाचा कोणताही पक्षच राहणार नाही. कारण प्रत्येकाला भाजपमध्ये यायचं आहे, असं खान म्हणाले. सौमित्र खान यांनी तृणमूल काँग्रेसचे नेते आणि ममता बॅनर्जी यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. ज्यांनी पापं केली आहेत, त्यांच्या घरासमोर आज बुलडोझर उभा आहे. २०२१ मध्ये याच अभिषेक बॅनर्जींनी भाजप कार्यकर्त्यांची घरं पाडली आहेत. आता त्यांच्यावर तीच वेळ आली आहे. त्यांनी नरकात जायला हवं, अशा तिखट शब्दांत खान यांनी बॅनर्जींवर टीका केली. तृणमूल काँग्रेसचे ५० आमदार आणि २० खासदार फुटतील, असा दावा सौमित्र खान यांनी केला आहे. विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवातून बाहेर पडण्याचा



प्रयत्न तृणमूल काँग्रेसकडून सुरू आहे. तृणमूलमध्ये अंतर्गत नाराजी आहे. बारासातच्या खासदार काकोली घोष दस्तीदार यांना तृणमूल काँग्रेसनं लोकसभेतून मुख्य प्रतोद पदावरुन हटवलं आहे. यानंतर घोष यांना केंद्र सरकारनं तातडीनं वाय दर्जाची सुरक्षा दिली आहे. काकोली घोष यांची भाजप सोबत जवळीक वाढत आहे.

# विमानांची इंधनकोंडी



हवाई वाहतुकीच्या इंधनाचे दर गगनाला भिडल्याने देशातील प्रमुख कंपन्यांची विमाने जमिनीवर आली आहेत. ङ्गएअर इंडियाफ्ने आपल्या देशांतर्गत विमान उड्डाणांमध्ये २२ टक्के कपात केली आहे; तसेच ङ्गइंडिगोफ्च्या उड्डाणांमध्येही पाच ते सात टक्के घट होण्याची शक्यता आहे. देशातील हवाई वाहतुकीच्या क्षेत्रात ९० टक्के वाटा असलेल्या या कंपन्यांच्या उड्डाणांमध्ये घट झाल्याचे या उद्योगाप्रमाणेच अन्य अवलंबून क्षेत्रांवरही गंभीर परिणाम होणार, हे निश्चित. ङ्गस्पाइसजेटफ आणि ङ्गअकासाफ्नेही हाच मार्ग अवलंबला आहे. प्रमुख कंपन्यांनी आंतरराष्ट्रीय उड्डाणेही कमी केलीत; त्यापाठोपाठ देशांतर्गत विमान वाहतूकही मंदावणार आहे. इराण-इमेरिका युद्धस्थिती आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतून तेलाची आवक आटल्याचे हे परिणाम. काही दिवसांपूर्वीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परकीय चलन वाचवण्यासाठी सोनेखरेदी आणि अनावश्यक विमानप्रवास टाळण्याचे आवाहन केले होते. आता परिस्थितीनेच लाखो प्रवाशांवर ही वेळ आणली आहे. युद्धसमाप्ती किंवा इंधनपुरवठा सुरळित होण्याची चिन्हे नाहीत. त्यामुळे हे संकट किती गहिरे होणार, याचा तूर्त अंदाज येत नाही. होर्मुझची सामुद्रधुनी ठप्प झाल्याने सुमारे ८० टक्के इंधन आयात करणाऱ्या भारतासारख्या देशांना इंधनटंचाईला तोंड द्यावे लागत आहे. एकीकडे ग्रामीण भागांत डिझेलअभावी जागेवर उभ्या असलेल्या शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टरपासून विमान वाहतुकीपर्यंत हे संकट पोहोचले आहे. युद्ध सुरू झाल्यानंतर ङ्गएटीएफफ च्या दरात जवळपास १३० टक्क्यांनी वाढ होऊन हे दर ८० हजार रुपयांवरून प्रति किलोलिटर एक लाख रुपयांच्या पुढे गेले आहेत. विमानांच्या परिचालनातील इंधनखर्चाचा सर्वसाधारण वाटा ४० टक्क्यांवरून ६० टक्क्यांवर पोहोचल्याने ही वाहतूक सुरू ठेवणे परवडणारे नाही; त्यामुळे या परिस्थितीत सरकारने हस्तक्षेप करावा, अशी मागणी ङ्गफेडरेशन ऑफ इंडियन एअरलाइन्सफ ने गेल्या महिन्यातच केली होती. त्यामध्ये केंद्राचे उत्पादन शुल्क आणि राज्य सरकारांच्या मूल्यवर्धित कराचा (व्हॅट) भार कमी करण्याची मागणी होती. केंद्राने स्थानिक उड्डाणांसाठी इंधन दरवाढीवर २५ टक्क्यांची मर्यादा घालण्यासाठी उपाययोजनाही केल्या होत्या. आता हवाई वाहतूक विभागाने विविध राज्यांना ङ्गव्हॅटफ कमी करण्याची विनंती केली असून, महाराष्ट्रासारख्या काही राज्यांनी त्याला सकारात्मक प्रतिसादही दिला आहे; मात्र इंधन दरवाढीच्या प्रमाणात तेवढे पुरेसे ठरलेले दिसत नाही. युद्ध सुरू झाल्यानंतर विमान तिकिटांच्या दरात ४० ते ५० टक्क्यांनी वाढ झाल्याने प्रवासी हैराण झाले आहेत. त्यातच या दोन्ही कंपन्यांची मिळून दररोजची दोनशे ते तीनशे उड्डाणे आता कमी होणार आहेत. या उड्डाणांमध्ये घट झाल्याने उर्वरित विमानांवर त्याचा भार येणार आणि तिकीटदरांचीही उड्डाणे होणे अपरिहार्य आहे. आता रद्द झालेल्या उड्डाणांच्या तिकिटांचे पैसे परत करणे किंवा प्रवाशांची अन्य व्यवस्था या कंपन्या करतील; परंतु यामुळे लाखो प्रवाशांची होणारी गैरसोय टळू शकणार नाही. एअर इंडियाफ चा तोटा २७ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. गेल्या काही काळात भूराजकीय समस्यांमुळे; तसेच पाकिस्तानातील हवाई बंदीमुळे या विमानांना लांबचे वळसे घ्यावे लागत असल्याने परिचालनाचा खर्चही वाढलेला आहे. त्यातच घसरत्या रुपयामुळे तेलाची आयात आणखी महाग ठरत असल्यामुळे विमान कंपन्या हैराण होणे साहजिक आहे. देशाच्या वाहतूक व्यवस्थेतला प्रमुख घटक असलेल्या या क्षेत्रापुढील अडचणी दूर करण्यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घेणे गरजेचे आहे. त्याशिवाय पर्यटन, हॉटेल आणि कॅबसारखी अन्य अनेक क्षेत्रे हवाई वाहतुकीवर अवलंबून असून, त्यामधील लाखो रोजगारांवर या संकटाचे अर्थव्यवस्थेवरही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम होणार आहेत. त्यामुळेच इंधनावर केंद्र आणि राज्यांनी करसवलती देणे, तेलशुद्धीकरणातील नफ्यावर मर्यादा आणणे आवश्यक आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगण आणि पश्चिम बंगाल आदी राज्यांमध्ये ङ्गव्हॅटफ्च्या दरात काही काळ कपात केल्यास त्या राज्यांच्या तिजोरीवर काय परिणाम होतात, याचा सर्वांगीण विचार करावा लागेल. मात्र, प्रामुख्याने तातडीच्या प्रवासासाठी वापर होणारी ही जीवनवाहिनी टिकवण्यासाठी उपाययोजना करण्यावाचून पर्याय नाही.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ‘महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन कायदा’ हिंदू देवस्थाने संपवणारा; मंदिर महासंघाचा इशारा

**सावंतवाडी/वृत्तसंस्था**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या वतीने प्रस्तावित असलेला ‘महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम २०२६’ हा कायदा येत्या पावसाळी अधिवेशनात मंजूर करण्याचे शासनाचे नियोजन आहे. मात्र, हा कायदा राज्यातील हजारो हिंदू देवस्थानांचे स्वायत्त अस्तित्व आणि त्यांच्या उत्पन्नांचे पारंपरिक स्त्रोत संपविणारा असून धार्मिक स्वातंत्र्य आणि पूजा-अर्चेवर गदा आणणारा आहे, असा गंभीर आरोप महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राज्य संघटक संजय जोशी यांनी येथे आयोजित पत्रकार परिषदेत केला.

वक्फ बोर्ड आणि चर्चच्या जमिनी वगळून केवळ हिंदू मंदिरांच्या जमिनींवर डोळा ठेवणारा हा डाव मंदिर विश्वस्त कधीही यशस्वी होऊ देणार नाहीत, असा इशाराही त्यांनी दिला. सावंतवाडी येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या वेळी सनातन संस्थेचे धर्मप्रचारक सद्गुरु सत्यवान कदम, हिंदु जनजागृती समितीचे राजेंद्र पाटील, विरेश माईणकर, मंदिर महासंघ सिंधुदुर्ग जिल्हा संयोजक शिवराम देसाई, यशवंत परब, हेमेंद्र गोवेकर आदी उपस्थित होते.



पत्रकार परिषदेत बोलताना संजय जोशी म्हणाले की, देशात भाजपची मंदिरांबाबतची भूमिका सकारात्मक असताना महाराष्ट्रातील हिंदुत्ववादी सरकारच्या काळात नेमके काय झाले, असा प्रश्न निर्माण होतो. तत्कालीन काँग्रेस सरकारच्या काळातही असाच निर्णय घेण्याचा प्रयत्न झाला होता, मात्र विरोधानंतर तो रद्द करण्यात आला.

आताच्या कायद्यामुळे देवस्थानांची सुमारे साडेचार लाख हेक्टर जमीन धोक्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांनी देवस्थानांना दिलेल्या इनामांच्या सनदी काढून घेण्याचे काम हे सरकार करत आहे का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. या अधिनियमाच्या आदेशाविरोधात कोणत्याही दिवाणी न्यायालयात दाद मागता येणार नाही, अशी तरतूद करण्यात आल्याने हिंदू समाजाने न्याय कोणाकडे मागायचा, असा प्रश्न त्यांनी केला. हा कायदा केवळ हिंदू मंदिरांना लागू करून संविधानातील समानतेच्या तत्त्वाचा भंग केला जात असून, यामुळे सामाजिक आणि धार्मिक संघर्ष निर्माण होऊ शकतो, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

**’अँटी लँड ग्रॅबिंग अॅक्ट’ लागू करण्याची मागणी..** महासंघाच्या वतीने शासनाकडे मागणी करण्यात आली आहे की, देवस्थान जमिनींना विशेष संरक्षण देण्यासाठी गुजरातच्या धर्तीवर ‘अँटी लँड ग्रॅबिंग अॅक्ट’ लागू करावा आणि ७/१२ उताऱ्यावर ‘देवस्थान जमीन प्रतिबंधित सत्ता प्रकार’ अशी स्पष्ट नोंद करण्यात यावी. या संदर्भात महाराष्ट्रभरातून ३०० हून अधिक निवेदने देण्यात आली असून, लवकरच सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांचीही भेट घेण्यात येणार असल्याचे जोशी यांनी सांगितले. हिंदु जनजागृती समितीचे राजेंद्र पाटील यांनी सांगितले की, कायद्यानुसार देवस्थानच्या जमिनी या अहस्तांतरणीय आहेत. मात्र, कुळाच्या नावाखाली या जमिनी गिळंकृत करण्याचा आणि भू-माफियांच्या घशात घालण्याचा हा कट आहे. राज्यकर्ते आणि बिल्डर यांचे साटेलोटे जगजाहीर असून, मंदिरांच्या जमिनी हडप करून हिंदूंची मंदिर संस्कृती नष्ट करण्याचा हा घाट आम्ही तीव्र आंदोलनाद्वारे हाणून पाडू, असा इशारा त्यांनी दिला.

## ‘पक्षाची बदनामी थांबवा, ठामपणे भूमिका मांडा’

**मुंबई/वृत्तसंस्था**

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाची मंगळवारी सायंकाळी उशिरा बैठक पार पडली. या बैठकीत पक्षाची बदनामी करणाऱ्यांना सडेतोड उत्तर द्या. पक्षाची बदनामी थांबवण्यासाठी वरिष्ठ नेत्यांनी ठामपणे आपली भूमिका मांडावी. पक्षात कोणतीही फूट पडणार नाही, पक्ष एकसंध आहे, असा संदेश लोकांपर्यंत पोहोचवा, अशा सूचना उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी वरिष्ठ नेत्यांना दिल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे आमदार, मंत्री आणि पदाधिकारी यांची बैठक मंगळवारी सायंकाळी उशिरा पार पडली. पक्षात फूट पडणार असल्याचा रोहित पवार यांचा आरोप आणि ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या पदावरून निर्माण झालेल्या संभ्रमानंतर झालेली ही पक्षाची पहिलीच बैठक होती. बैठकीच्या सुरुवातीलाच सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांच्या पदाविषयी निर्माण झालेल्या संभ्रमाबाबत सुनेत्रा पवार यांनी सारवासारव केली. पक्षात



ज्येष्ठ नेत्यांचा योग्य सन्मान केला जाईल, असेही त्या म्हणाल्या. पक्षात फूट पडणार आहे, २२ आमदार शरद पवार गटात सहभागी होणार आहेत, असे सांगून पक्षाची बदनामी केली जात आहे, त्यांना सडेतोड उत्तर द्या. पक्षात कुठली फूट पडणार नाही. पक्ष एकसंध आहे, असा संदेश समाजात गेला पाहिजे. त्या विषयी वरिष्ठ नेत्यांनी माध्यमांमध्ये बोलले पाहिजे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. माध्यमांमध्ये पक्षाची भूमिका मांडण्याची जबाबदारी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते प्रकाश सोळंके, छगन भुजबळ, अनिल पाटील यांच्यावर सोपविण्यात आली.

## अमित शहा शेतकऱ्यांना दिलासा देणार; दिल्लीतील कांदा, साखर उद्योगाबाबतच्या उद्याच्या बैठकीकडे लक्ष

**मुंबई/वृत्तसंस्था**

राज्यात कोसळलेले कांद्याचे दर आणि साखर उद्योगासमोरील आर्थिक अडचणींबाबत केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली दिली येथे आज, बुधवारी बैठक होणार आहे. या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे – पाटीराज्यात कोसळलेले कांद्याचे दर आणि साखर उद्योगासमोरील आर्थिक अडचणींबाबत केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली दिली येथे आज, बुधवारी बैठक होणार आहे. ल यांच्यासह अन्य मंत्री दिल्लीला जाणार आहेत.

केंद्र सरकारने साखर निर्यातीवर बंदी घातल्यामुळे साखर उद्योग अडचणीत आला आहे. २०१९ मध्ये साखरेचे किमान विक्री मूल्य (एमएसपी) ३१ रुपये प्रति किलो निश्चित करण्यात आले होते. त्यानंतर २०२६ पर्यंत एमएसपीमध्ये कोणतीही वाढ झाली नाही. पण, २०१९ मधील २,७५० रुपये प्रति टन असलेली एफआरपी वाढून २०२६ मध्ये २९.१० टक्क्यांनी वाढून ३५५० रुपयांवर गेली आहे. साखरेचा दर २०१९ पासून स्थिर आणि एफआरपीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने उद्योगाला आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्यासह इथेनॉलच्या खरेदी दरातही अपेक्षित वाढ झाली नाही. इथेनॉल प्रकल्प



आणि प्रकल्पाच्या विस्तारीकरणाला देण्यात येणाऱ्या व्याज सवलत, अनुदानेही १७. ११ कोटी रखडले आहेत. या सर्व विषयांवर बैठकीत सविस्तर चर्चा होणार आहे.

राज्यात कांदा दराचा प्रश्न चिघळला आहे. शेतकऱ्यांच्या कांद्याला एक रुपये, सव्वा रुपये प्रति किलो दर मिळत आहे. कांदा दराच्या प्रश्नावरून शेतकऱ्यांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला आहे. महाविकास आघाडीने या प्रश्नी मंगळवारी चांदवड येथे मोर्चा काढल्यामुळे कांद्याच्या दराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नाफेड, एनसीसीएफकडून फक्त दोन लाख टन खरेदी होणार आहे. खरेदी गतवर्षीच्या तुलनेत कमी आणि कमी दराने होणार असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला आहे. या प्रश्नावरही शहा यांच्या उपस्थितीत चर्चा होणार आहे.

## 'कॉक्रोच जनता पार्टीचा आवाज जेवढा दाबाल, तेवढेच ते उसळून येतील'

**अमरावती/वृत्तसंस्था**

कॉक्रोच जनता पार्टीचे अकाउंट बंद (ब्लॉक) करण्यात आल्यानंतर देशभरातून त्यावर प्रतिक्रिया उमटत असतानाच सत्तारूढ शिवसेना शिंदे गटाचे आमदार बच्चू कडू यांनी देखील या मुद्यावर परखड भाष्य केले आहे. बच्चू कडू म्हणाले, केंद्र सरकाने या तरूणाईचा आवाज दाबण्याचे काम करू नये, त्यांची ऊर्जा विधायक कामांसाठी वापरायला हवी.

बच्चू कडू म्हणाले, तरूणांनी केवळ व्हॉट्सअॅपपुरते मर्यादित न राहता, रस्त्यावर उतरले पाहिजे. प्रत्यक्ष काम केले पाहिजे. सरकारवर अंकुश ठेवला पाहिजे. यात वाईट काय आहे. चांगले काम करायचे असेल, तर त्यात पक्ष ही मर्यादा राहत नाही. केंद्र सरकारने त्यांचा आवाज दाबू नये. जेवढा त्यांचा आवाज दाबला जाईल, तेवढाच तो उसळून बाहेर येईल. कधी-कधी केंद्र सरकार चुकीचा निर्णय घेत असेल, तर ते थांबवले पाहिजे. जर तरूणाई अशा पद्धतीने समोर येत असेल, तर त्यांची ऊर्जा विधायक कामांकडे कशी वळवता येईल, चांगल्या कामांसाठी ती कशी वापरता येईल, याचा विचार व्हायला हवा. तसे प्रयत्न आपण केले पाहिजे.



बच्चू कडू म्हणाले, माझे काम शिवसेना वाढवण्याचे आहे. कोण मंत्री होणार, कोण जिल्हा प्रमुख होणार, कुणाला पद मिळणार याकडे आपले लक्षच नाही. आमचे लक्ष आहे, पिक घेण्याकडे. ते पीक कुणाला द्यायचे, ते कोणाला विकणार, याकडे आम्ही पाहणार नाही. उत्तम शेती करायची हेच आमचे उद्दिष्ट आहे. पक्षसंघटनेत भरघोस पीक घेण्याकडे आम्ही अधिक लक्ष केंद्रित करणार आहोत. प्रचंड ताकदीतून, मेहनतीतून आम्हाला शिवसेना उभी करायची आहे. त्यामुळे कोण मंत्री कोण आमदार, याविषयी आमचे काहीही घेणे-देणे नाही.

बच्चू कडू म्हणाले, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आंदोलनासाठी रस्त्यावर उतरले, त्याबद्दल त्यांचे आभारच मानले पाहिजेत. ज्या राज्यात काँग्रेसचे सरकार आहे, त्या ठिकाणी कांद्याला काय भाव दिला जातो, हे तपासले पाहिजे. विरोधात आहे, म्हणून त्यांना शेतकरी आठवतो. सत्तेत असताना शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा त्यांना विसर पडतो. आम्ही सत्तेत असूनही शेतकरी, शेतमजूर, दिव्यांगांच्या प्रश्नांखेरीज आम्ही बोलूच शकत नाही. आमच्या डोक्यात सर्वप्रथम शेतकरी, दिव्यांग बांधव राहतील, हे आम्ही आधीपासूनच सांगत आलो आहे. आगामी खरीप हंगामासाठी शेतीच्या मशागतीसाठी ट्रॅक्टरला डिझेल पुरवायला हवे. ट्रॅक्टरधारकांना अधिक सूट दिली पाहिजे. शेतकऱ्यांसाठी अतिरिक्त डिझेल आरक्षित केले पाहिजे.

# बायकोला भेटायला आला अन् पोलिसांच्या जाळ्यात अडकला, कोट्यवधींची फसवणूक

**बारामती/वृत्तसंस्था**

शासकीय नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत तरुण-तरुणींसह अनेकांकडून कोट्यवधी रुपये उकळणाऱ्या टोळीचा बारामती तालुका पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. बनावट नियुक्तीपत्रांच्या माध्यमातून तब्बल 1 कोटी 36 लाख 90 हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, सरकारी नोकरीचे आमिष देऊन कोट्यवधी रुपये उकळणाऱ्या आरोपीला अखेर बारामती पोलिसांनी जेरबंद केलं आहे. या आरोपीने सरकारी नोकरीचे आमिष देऊन एक कोटींपेक्षा जास्त रुपये उकळले होते.



आरोपीने खोटे नियुक्तीपत्र देखील दिले होते. तसेच पैस घेऊन आरोपी फरार झाला होता. आरोपी अनेक दिवसांपासून पोलिसांना चकवा देत होता. पोलीस आरोपीचा शोध घेत होते. पण तो पोलिसांच्या हातून निसटत होता. अखेर पोलिसांना आरोपीबद्दल खात्रीलायक माहिती मिळाली. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचला आणि आरोपीला जेरबंद केलं.२०२३ ते ४ मे २०२५ या कालावधीत तांदुळवाडी येथील महिला रुग्णालय आणि मळद परिसरात ही फसवणूक सुरू होती. मुख्य आरोपी अनिकेत धनंजय पाठक याने 'गट-क अधिपरिचारिका' पदावर सरकारी नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन देत महिला रुग्णालयातील स्टाफ नर्स तसेच इतर इच्छुकांशी संपर्क साधला. त्यानंतर अजिंक्य पाठक, सिओना साळवे उर्फ सिओना अनिकेत पाठक, सुधाकर सोळंकी, सागर गायकवाड आणि सुरज असदकर यांच्या मदतीने फिर्यादी आणि इतरांकडून वेळोवेळी ऑनलाईन आणि रोख स्वरूपात मोठी रक्कम उकळली.

विश्वास बसावा यासाठी आरोपींकडून बनावट नियुक्तीपत्रे देण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात कोणतीही नोकरी मिळाली नसल्याचे समोर आल्यानंतर फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी मार्च २०२६ मध्ये बारामती तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.दरम्यान, फरार आरोपी सुरज तिमयया असदकर हा चिंचवडगाव येथे पत्नीला भेटण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी याच माहितीच्या आधारे सापळा रचला. अखेर आरोपी खरंच तिथे आला. यावेळी पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या आणि त्याला अटक केली. चौकशीत आरोपीने आर्थिक लाभासाठी संगनमताने गुन्हा केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. न्यायालयाने त्याला सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## सख्खा भाऊ पक्का वैरी! पैशांसाठी मोठ्या भावाने धाकट्याला संपवलं, नागपूर हादरलं

**नागपूर/वृत्तसंस्था**

हरवलेल्या साडेचार हजार रुपयांच्या संशयातून झालेल्या वादात मोठ्या भावाने लहान भावाची लोखंडी रॉडने हत्या केली. ही धक्कादायक घटना नंदनवन पोलिस ठाण्याच्या हद्दीतील हिवरीनगर झोपडपट्टीत उघडकीस आली.भगवान गोविंदराव बाबुले (४०) असे आरोपीचे नाव असून त्याच्यावर भाऊ प्रदीप गोविंदराव बाबुले (३७) याच्या हत्येचा आरोप आहे. दोघेही हिवरीनगर झोपडपट्टी परिसरात एकाच घरात आपापल्या कुटुंबासह वेगवेगळे राहात होते. दोघेही मजुरीचे काम करत होते. त्यापैकी प्रदीप हा फर्निचरचे काम करीत असे. काही दिवसांपूलाला एका कामाचे साडेचार हजार रुपये मिळाले होते. मात्र, हे पैसे हरवल्याचे त्याच्या लक्षात आले. पैसे सापडत नसल्याने प्रदीपने त्याचा संशय मोठा भाऊ भगवान याच्यावर घेतला. यावरून रविवारी रात्री दोघांमध्ये जोरदार वाद झाला.वाद विकोपाला गेल्यानंतर संतापलेल्या भगवानने घरात पडलेल्या लोखंडी रॉडने प्रदीपच्या डोक्यावर वार केले. गंभीर जखमी झालेल्या प्रदीपचा




जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. माहिती मिळताच नंदनवन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. या दोघांची बहीण विद्या अरईकर हिने दिलेल्या तक्रारीवरून नंदनवन पोलिसांनी आरोपी भगवान बाबुलेविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.मोठ्या भावाने लहान भावाची हत्या करण्याची ही गेल्या तीन दिवसांतील दुसरी घटना आहे. हिंगणा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कटंगधरा येथे कौटुंबिक वादातून मोठ्या भावाने लहान भावाची हत्या केल्याची घटना शनिवारी उघडकीस आली होती. यात हरिश्चंद्र बाबुलाल पंधराम (३४) याने त्याचा लहान भाऊ शुभम याच्यावर झोपेतच लाकडी दांड्याने प्रहार करत त्याचा खून केला होता.

## ग्राहक नडला, बँकेला पंगा महागात पडला; 400 रुपये देण्यास नकार दिला अन् आता थेट 58,700 रुपयांचा फटका

**मुंबई/वृत्तसंस्था**

महाराष्ट्रातील संभाजीनगर येथील एटीएममधील एक किरकोळ तांत्रिक बिघाड एसबीआयसाठी एक मोठी समस्या बनली आहे. ग्राहकाच्या तक्रारीचे वेळेवर निराकरण करण्यात अयशस्वी ठरल्याबद्दल एसबीआयला आता नुकसान भरपाई आणि 58,700 रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. हे प्रकरण संभागीनरगचे रहिवासी संबंधित आहे.2016 मध्ये, त्यांनी एसबीआयच्या एटीएममधून 1500 रुपये काढण्याचा प्रयत्न केला, परंतु मशीनमधून फक्त 1100 रुपये मिळाले, म्हणजेच 400 रुपयांची तूट आली. सुरुवातीला ही रक्कम किरकोळ वाटली, परंतु बँकेच्या निष्काळजीपणामुळे हे प्रकरण ग्राहक आयोगापर्यंत पोहोचले.2016 मध्ये, व्यक्तीने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आवारात असलेल्या एसबीआयच्या एटीएममधून पैसे काढायला गेले. व्यवहार पूर्ण झाल्यावर त्यांच्या लक्षात आले की मशीनमधून पूर्ण रक्कम मिळाली नव्हती. त्यांनी तात्काळ बँकेला कळवले आणि 4 ऑक्टोबर 2016 रोजी लेखी तक्रार दाखल केली. ही तक्रार बँकेच्या ग्राहक सेवा, नोडल अधिकारी आणि बँकिंग लोकपाल यांच्याकडे पोहोचवली. असे असूनही, बँक वेळेवर हा प्रश्न सोडवण्यात अयशस्वी ठरली. ते अनेक वर्षे बँकेत जात राहिले, पण त्यांना कोणताही दिलासा मिळाला नाही.


यानंतर हे प्रकरण जिल्हा ग्राहक आयोगाकडे पोहोचले. आयोगाने हे मान्य केले की, बँक ग्राहकाची तक्रार गांभीर्याने घेण्यात आणि आरबीआयच्या नियमांचे पालन करण्यात अयशस्वी ठरली. आयोगाने म्हटले की, ग्राहकाला वेळेवर दिलासा देणे ही बँकेची जबाबदारी होती. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार, जर एटीएममधून पैसे मिळाले नाहीत किंवा कमी मिळाले, तर बँकेने सात कामकाजाच्या दिवसांत तक्रार सोडवणे आवश्यक आहे. जर निर्धारित वेळेत तक्रार सोडवली नाही, तर बँकेला ग्राहकाला दररोज 100 रुपये नुकसान भरपाई द्यावी लागते.जिल्हा ग्राहक आयोगाने एसबीआयला निष्काळजी ठरवून, 100 रुपये नुकसान भरपाई देण्याचा आदेश दिला. 477 दिवसांच्या विलंबासाठी 47,700 रुपये, तसेच खटल्याच्या खर्चापोटी 1,000 रुपये. नंतर, जेव्हा एसबीआयने राज्य आयोगाकडे अपील केले, तेव्हा आयोगाने ते फेटाळले आणि अपील खर्चापोटी अतिरिक्त 10,000 रुपये मागितले. यामुळे एकूण रक्कम 58,700 रुपये झाली.

भारतीय संस्कृतीत लग्न हे दोन व्यक्तींपुरतं मर्यादित नसून दोन कुटुंबांच्या स्नेहबंधाचं प्रतीक मानलं जातं. त्यामुळे लग्नसोहळा अधिकाधिक चांगला आणि अविस्मरणीय कसा होईल याकडे लक्ष दिलं जातं. पण या नादात काही वेळा अशा घटना घडतात की, त्याबद्दल काय बोलावं हेच कळत नाही. होय, आता हेच प्रकरण पाहा ना... लग्नात नवरदेव अपेक्षेपेक्षा मोठं वऱ्हाड घेऊन आला. त्यामुळे नवरीच्या वडिलांचं आर्थिक गणित बिघडलं. पण रागाच्या भरात नवरीच्या कुटुंबीयांनी जेवणात जमालगोटा मिसळला. अन् मग काय, संपूर्ण वऱ्हाडाचं पोट बिघडलं आणि ते नदीच्या दिशेने पळू लागले. हा व्हिडीओ सध्या व्हायरल होत असून नेटकरी त्यावर विविध प्रतिक्रिया देत आहेत.मीडिया रिपोर्टनुसार, ही घटना बिहारमधील सिवाण येथे घडली आहे.

## शहाचा नंबर 'गॉड' नावाने सेव्ह, मनीषा हवालदारच्या नवऱ्याच्या फोनमध्ये चॅटिंग

**पुणे/वृत्तसंस्था**

'नीट' पेपरफुटी प्रकरणात 'गॉड' नावाने सेव्ह असलेल्या 'व्हॉट्सअॅप अकाउंट'चा वापर करणाऱ्या तेजस हर्षदकुमार शहा या तरुणाला केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) मंगळवारी अटक केली. त्याने भौतिकशास्त्राचे प्रश्न हाताने लिहून राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या (एनटीए) विषयतज्ज्ञ मनीषा हवालदार हिच्या पतीच्या व्हॉट्सअॅपवर पाठविल्याचे तपासात निष्पन्न झाले. सीबीआयच्या पुण्यातील न्यायालयाचे विशेष न्यायाधीश आर. आर. मेंढे यांनी शहाला दोन दिवसांची प्रवासी कोठडी (ट्रान्झिट रिमांड) सुनावली.तपासात मनीषा हवालदार यांच्या पतीच्या मोबाइलमधील 'गॉड' नावाच्या क्रमांकाशी झालेल्या चॅटमुळे संशय



निर्माण झाला होता. सीबीआयने सदाशिव पेठेतील त्यांच्या घरावर टाकलेल्या छाप्यात काही महत्त्वाचे डिजिटल पुरावे जप्त केले. तपासादरम्यान हवालदार हिने सहआरोपी मनीषा मांढरे यांच्यासोबतचे व्हॉट्सअॅप चॅट डिलीट केल्याची कबुली दिल्याची माहिती सूत्रांनी दिली; तसेच भौतिकशास्त्र विषयाच्या हस्तलिखित नोट्स जाळून टाकल्याचाही संशय आहे.पथकाने हवालदारच्या सदाशिव पेठ भागातील घरावर टाकलेल्या छाप्यावेळी तिच्यासह पतीचा मोबाइल जप्त केला. या मोबाइलच्या तांत्रिक तपासात 'गॉड' नावाने सेव्ह असलेल्या मोबाइल क्रमांकासोबतचे चॅटिंग आढळले. या चॅटिंगमध्ये भौतिकशास्त्र विषयाचे हस्तलिखित स्वरूपातील प्रश्न आढळून आले. हा क्रमांक तेजस शहा याचा असल्याचे निष्पन्न झाल्यावर केंद्रीय तपास यंत्रणेच्या (सीबीआय) च्या पथकाने त्याची चौकशी केली.त्या वेळी मनीषा हवालदारने तेजसला भौतिकशास्त्र विषयाचे प्रश्न हस्तलिखित स्वरूपात पतीच्या मोबाइल क्रमांकावर पाठविण्यास सांगितले. त्यानंतर तेजसने संबंधित कागदपत्रे नष्ट केल्याचे उघडकीस आले.या हस्तलिखित स्वरूपातील प्रश्नपत्रिकेतील बहुतांश प्रश्न यंदाच्या परीक्षेत आल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणात तेजस शहाला अटक करून मंगळवारी रात्री न्यायालयासमोर हजर करण्यात आले. प्रश्न लिहून देण्यापलीकडे तेजस शहाची या संपूर्ण रॅकेटमध्ये नेमकी काय भूमिका होती, इतर आरोपींशी त्याचे आर्थिक किंवा तांत्रिक व्यवहार झाले होते का, याचा तपास केंद्रीय तपास यंत्रणेकडून (सीबीआय) सुरू आहे.गुन्ह्याच्या तपासासाठी आरोपीला प्रवासी कोठडी देण्याची विनंती 'सीबीआय'चे तपास अधिकारी आणि सरकारी वकील अभयराज आरीकर यांनी केली. त्यानुसार, न्यायालयाने आरोपीला दोन दिवसांची प्रवासी कोठडी (ट्रान्झिट रिमांड) सुनावली आहे.

# RCBची अंतिम फेरीत धडक!

# गुजरातवर मिळवला दणदणीत विजय

## पॉवरप्ले ठरला सामन्याचा टर्निंग पॉईंट

■ मुंबई, वृत्तसंस्था :

आयपीएल २०२६च्या अंतिम सामन्याचा पहिला संघ ठरला. पहिल्या क्वालिफायर सामन्यात आरसीबीने गुजरात टायटन्सवर दणदणीत विजय मिळवत अंतिम सामन्यात धडक मारली. आरसीबीने गुजरातचा ९२ धावांनी पराभव केला. आरसीबीने सांघिक कामगिरीच्या बळावर हा शानदार विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने २५४ धावांचा डोंगर उभारला. ही धावसंख्या आयपीएल प्लेऑफ इतिहासातील आजवरची सर्वात मोठी धावसंख्या होती. तर पराभूत झालेला संघ गुजरात टायटन्स २९ मे रोजी दुसरा क्वालिफायर सामना खेळणार आहे.

आरसीबीला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केल्यानंतर गुजरातचे गोलंदाज व फिल्डिंगमधील काही चुकांमुळे गुजरातचा संघ मागे पडला. रजत पाटीदार दोन वेळा जीवदान मिळाल्यानंतर त्याने मागे वळून पाहिलं नाही आणि नाबाद ९३ धावांची वादळी खेळी साकारली. यासह आरसीबीने प्रथम फलंदाजी २५४ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरात चांगली सुरुवात केल्यानंतर गुजरातचा डाव मात्र पत्त्यांसारखा कोसळला. गुजरातने पॉवरप्लेमध्येच ५ विकेट्स गमावल्या आणि इथेच सामना आरसीबीने आपल्या बाजूने फिरवला.



आरसीबीने दिलेल्या २५५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातने पहिल्या षटकात चौकारांच्या फटकेबाजीसह सुरुवात केली. पण यानंतर मात्र संघाचा डाव पत्त्यांसारखा कोसळला. गुजरातने पॉवरप्लेमध्ये ५ विकेट्स गमावल्या आणि आरसीबीने इथेच सामना आपल्या बाजूने वळवला होता. साई सुदर्शन १४ धावांवर हिट विकेटमुळे बाद झाला. तर भुवनेश्वर कुमारने २ धावांवर शुबमन गिलला तर जोश हेझलवूडने बटलरला २९ धावांवर क्लीन बोल्ड केलं. तर रसिख सलामने सहावं षटक डबल विकेट्स मेडन टाकत गुजरातला मोठे धक्के दिले. रसिखने या षटकात निशांत सिंधु व जेसन होल्डरला बाद केलं. यानंतर वॉशिंग्टन सुंदर ८ धावा, रशीद खान ८ धावा तर कगिसो रबाडा ९ धावांवर बाद झाले. तर गुजरातकडून राहुल तेवतियाने एकट्याने कडवी झुंज दिली. राहुल तेवतिया ४३ चेंडूत ८ चौकार व ४ षटकारांसह ६८ धावा करत बाद झाला. आरसीबीकडून जेकब डफीने ३ विकेट्स, तर रसिख सलामने व भुवनेश्वर कुमार यांनी प्रत्येकी २ विकेट्स हेझलवूड, कृणाल पंड्या यांनी प्रत्येकी १-१ विकेट्स घेतल्या.

तत्पूर्वी गुजरातने नाणेफेक जिंकत आरसीबीला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. वेंकटेश अय्यर व विराट कोहलीची जोडी फलंदाजीसाठी उतरली. वेंकटेश १९ धावा करत झेलबाद झाला. त्यानंतर विराट कोहली व देवदत्त पडिक्कल यांनी दुसऱ्या विकेटसाठी ३८ चेंडूत ७२ धावांची खेळी केली. विराट २५ चेंडूत ४३ धावा तर देवदत्त पडिक्कल ३० धावा करत बाद झाले. यानंतर रजत पाटीदार व कृणाल पंड्या यांनी संघाचा डाव सावरला. दोघांनी ४५ चेंडूत ९५ धावांची खेळी केली. कर्णधार रजत पाटीदारने ३३ चेंडूत ५ चौकार व ९ षटकारांसह ९३ धावांची खेळी केली. तर कृणाल पंड्याने २८ चेंडूत ४३ धावांचं योगदान दिलं. तर जितेश शर्माला अखेरीस सूर गवसला आणि त्याने ५ चेंडूत एक चौकार एक षटकारासह १५ धावांची खेळी केली आणि संघाला २५४ धावांपर्यंत नेण्यात पाटीदारची चांगली साथ दिली. गुजरातकडून कगिसो रबाडा व जेसन होल्डर यांनी प्रत्येकी २ विकेट्स तर प्रसिधने १ विकेट घेतली.

---

## ‘या’ WWE स्टारने वैभवसूर्यवंशीची जर्सी घालत खास पोस्ट केली शेअर




■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

वैभव सूर्यवंशीने यंदाच्या आयपीएलमध्ये आपल्या वादळी फटकेबाजीने सर्वांचं लक्ष वेधलं आहे. अवघ्या १५ वर्षाच्या सूर्यवंशीने प्रत्येक सामन्यात नवनवे विक्रम आपल्या नावे केले आहेत. दिग्गजांना मागे टाकत सर्वात कमी वयात अनेक विक्रम आपल्या नावे करणारा भारतीय खेळाडू म्हणून त्याने सर्वांचं लक्ष वेधलं. आता आयपीएल २०२६ मध्ये त्याचा संघ राजस्थान रॉयल्स प्लेऑफमध्ये पोहोचला असून एलिमिनेटर सामना खेळणार आहे. यापूर्वी एका WWE स्टारने त्याच्या नावाची जर्सी घालत त्याला पाठिंबा दर्शवला आहे.

आयपीएल २०२६ च्या एलिमिनेटरमध्ये राजस्थान रॉयल्स व सनरायझर्स हैदराबाद यांच्यात खेळवला जाणार आहे, हा सामना आज २७ मे रोजी न्यू चंदीगढमध्ये खेळवला जाईल. या सामन्यातील विजेता संघ गुजरात टायटन्सविरुद्ध दुसरा क्वालिफायर सामना खेळेल. तर पराभूत संघ स्पर्धेतून बाहेर होईल.

राजस्थानच्या या सामन्यापूर्वी WWE स्टार ड्रयू मॅकइंटायर याने वैभव सूर्यवंशीची जर्सी घालत व्हीडिओ शेअर केला आहे. खरंतर मॅकइंटायर क्रिकेटप्रेमी आहे. तो विशेषतः भारतीय क्रिकेट संघाचा चाहता आहे. त्याने अनेक मोठ्या प्रसंगी संघाला पाठिंबाही दिला आहे. पुन्हा एकदा, मॅकइंटायरने चाहत्यांची मनं जिंकली आहेत. यावेळी, तो १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीच्या नावाची जर्सी घालून जिममध्ये वर्कआऊट करताना दिसला. आयपीएल २०२६ सध्या भारतात चर्चेत आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळूरने गुजरातला हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. लवकरच राजस्थान रॉयल्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात एलिमिनेटर सामना खेळला जाईल.वैभव सूर्यवंशीने राजस्थानकडून खेळताना धुमाकूळ घातला आहे. त्याने ५०० हून अधिक धावा केल्या आहेत. वयाच्या १५ व्या वर्षी तो जागतिक स्तरावर प्रसिद्ध झाला आहे. एलिमिनेटर सामन्यापूर्वी ड्रयू मॅकइंटायरने सूर्यवंशीला पाठिंबा दिला आहे. मॅकइंटायरने इन्स्टाग्रामवर जिममध्ये व्यायाम करत असल्याचा एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. त्याने ०३ जर्सी क्रमांक असलेला आणि सूर्यवंशीचं आडनाव असलेली राजस्थानची जर्सी घातली आहे. मॅकइंटायरचा हा व्हिडिओ इंटरनेटवर व्हायरल होत आहे.

## दिव्याची जगज्जेतीवर मात, ‘आर्मागेडॉन’डावात वेन्जूनवर सरशी

■ ओस्लो/वृत्तसंस्था

भारताची युवा ग्रँडमास्टर दिव्या देशमुखने प्रतिष्ठेच्या नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत संस्मरणीय पदार्पण करताना पहिल्याच फेरीत महिला जगज्जेत्या जू वेन्जूनचा ‘आर्मागेडॉन’ डावात पराभव केला. विशेष म्हणजे, नागपूरच्या २० वर्षीय दिव्याने काळ्या मोहऱ्यांनी खेळताना बाजी मारली. खुल्या विभागात जगज्जेता दोम्माराजू गुकेश, आर. प्रज्ञानंद या भारतीयांनीही सकारात्मक सुरुवात केली.

रेटी/कॅटलान पद्धतीने खेळल्या गेलेल्या लढतीत दिव्याने पटाच्या मध्यभागावर नियंत्रण राखत जू वेन्जूनला प्रत्येक चालीसाठी विचार करायला भाग पाडले. दिव्याने हत्तीचा प्रभावी वापर करत बचाव भक्कम ठेवला. वेन्जूनने राजाच्या बाजूने आक्रमक चाली रचण्याचा प्रयत्न केला, पण दिव्याने अचूक खेळ करत वेन्जूनच्या राजावर दडपण निर्माण केले. अखेरीस ५२ चालींनंतर पारंपरिक डाव बरोबरीत सुटला. त्यानंतर बरोबरीची कोंडी फोडण्यासाठी झालेल्या ‘आर्मागेडॉन’ डावात दिव्याने शानदार खेळ करत विजय मिळवला. ‘आर्मागेडॉन’ डावात पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळणाऱ्या खेळाडूला १० मिनिटे, तर काळ्या मोहऱ्यांनी खेळणाऱ्या खेळाडूला ७ मिनिटांचा वेळ दिला जातो. पांढऱ्या मोहऱ्यांनी विजय मिळवणे आवश्यक असते, तर काळ्या मोहऱ्यांनी बरोबरी पुरेशी ठरते. या दडपणाखाली दिव्याने संयम राखत विजय मिळवला.



तिने अश्वाच्या अप्रतिम चालीने वेन्जूनला शरणागती पत्करण्यास भाग पाडले. त्या चालीमुळे वेन्जूनवर वजीर गमावण्याची वेळ आली आणि त्यानंतर पुनरागमन करणे तिला अशक्य झाले. खुल्या विभागात गुकेश आणि प्रज्ञानंद यांनी आपल्या सामन्यांत ‘आर्मागेडॉन’ टायब्रेकमध्ये विजय मिळवला. गुकेशला जर्मनीचा ग्रँडमास्टर व्हिन्सेन्ट केमेरविरुद्ध संघर्ष करावा लागला. या दोघांमधील पारंपरिक डाव जवळपास पाच तास आणि १४४ चालींनंतर बरोबरीत सुटला. त्यानंतर टायब्रेकमध्ये गुकेश विजयी ठरला. दुसरीकडे, प्रज्ञानानंदने अमेरिकेचा ग्रँडमास्टर वेस्ली सो याच्याविरुद्ध पारंपरिक डाव बरोबरीत सोडवल्यानंतर ‘आर्मागेडॉन’मध्ये बाजी मारत १.५ गुण मिळवला. महिला विभागातील अन्य भारतीय बुद्धिबळपटू कोनेरू हम्पीने मात्र निराशाजनक कामगिरी केली. तिला बिबिसारा असाउबायेवाने पारंपरिक डावातच पराभूत केले.

## सामन्यादरम्यान अर्ध्या तासाच्या लेझर शोवर कडाडून टीका

■ ओस्लो/वृत्तसंस्था

लाईव्ह मॅचदरम्यान सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्याचा अगम्य प्रकार आयपीएल स्पर्धेतील प्लेऑफच्या महत्त्वपूर्ण लढतीत पाहायला मिळाला. हिमालयाच्या पायथ्याशी वसलेल्या धरमशाला इथल्या स्टेडियममध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना सुरू आहे. पहिली इनिंग्ज संपल्यानंतर मैदानाचं सांस्कृतिक व्यासपीठात रुपांतर झालं.

अर्धा तास चाललेल्या या कार्यक्रमाची सुरुवात व्हायोलिन जुगलबंदीने झाली. माँ तुझे सलाम आणि चक दे इंडियाच्या धूनवर ही जुगलबंदी रंगली. त्यानंतर लेझर शो झाला



आणि मग मोठ्या प्रमाणावर फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वीच इंधन वाचवा, संसाधनं वाचवा असं आवाहन केलं होतं. मात्र प्लेऑफसारख्या महत्त्वपूर्ण लढतीदरम्यान खेळाडूंची एकाग्रता भंग करून एवढा मोठा कार्यक्रम गरजेचा होता का असा प्रश्न विचारला जातो आहे. सोशल मीडियावर लोकांनी कठोर शब्दात या कार्यक्रमावर टीका केली आहे. मैदानात डीजेवर गाणी वाजतात हे ठीकेय पण सामना सुरू असताना अर्धा तास अशा स्वरुपाचा कार्यक्रम करणं हे विचित्र आहे असं अनेकांनी म्हटलं आहे. इंधन वाचवा यासाठी उपाययोजना सुरू असताना इतक्या मोठ्या प्रमाणावर फटाक्यांची आतषबाजी कोणासाठी असा सवाल अनेकांनी विचारला आहे.

चाहते क्रिकेटचा सामना पाहण्यासाठी आले आहेत. तो त्यांना शांतपणे पाहू द्या असंही अनेकांनी म्हटलं आहे. मुंबई, चेन्नई, कोलकाता या मोठ्या केंद्रांऐवजी धरमशालाला प्लेऑफसारखी महत्त्वपूर्ण लढतीचा मान देण्यात आला आहे. लेझर शो, फटाक्यांची आतषबाजी हे शक्तीप्रदर्शन आहे अशी खोचक टीकाही काहींनी केली आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# 'ढसाळ' चरित्रपटाचा दमदार पोस्टर लाँच; नामदेव ढसाळांचा संघर्षमय प्रवास रुपेरी पडद्यावर

दलित पँथर आणि विद्रोही कवी नामदेव ढसाळ यांच्या जीवनावर आधारित 'ढसाळ' या चरित्रपटाचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती'च्या निमित्ताने पोस्टर प्रदर्शित करण्यात आले. मुंबईत हजारोंच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. एक ऑक्टोबर रोजी हा चित्रपट मराठी आणि हिंदी भाषेत प्रदर्शित होणार आहे. ललित प्रभाकर नामदेव ढसाळ यांच्या भूमिकेत झळकणार असून, पोस्टरमधून त्याच्या लुकची प्रभावी झलकही समोर आली आहे.






संजय पांडेय आणि दि बायोस्कोप फिल्म्स प्रस्तुत वरुणा मदनलाल राणा निर्मित या चित्रपटात नामदेव ढसाळ यांच्या संघर्षमय आणि ज्वलंत जीवनप्रवासाचे वास्तववादी चित्रण पाहायला मिळणार आहे. वरुणा राणा लिखित व दिग्दर्शित आणि प्रताप गंगावणे यांच्या संवादांनी सजलेल्या या चित्रपटातून अन्याय आणि शोषणाविरुद्ध नामदेव ढसाळ यांनी उभारलेला लढा, त्यांच्या लेखणीतून पेटलेली क्रांती आणि समाजमनाला हादरवून टाकणारे विचार यांचा ठसा उमटणार आहे. संगीतकार इलैयाराजा यांचे संगीत लाभले आहे. गीतकार इर्शाद कामील, गुरू ठाकूर यांनी गाणी लिहिली आहेत. ललित प्रभाकरचे नामदेव ढसाळांच्या रूपात रूपांतर प्रख्यात रंगभूषाकार श्रीकांत देसाई यांनी केले आहे.

यावेळी दिग्दर्शिका वरुणा राणा म्हणाल्या, नामदेव ढसाळ हे केवळ व्यक्तिमत्त्व नव्हे, तर एक प्रक्षोभक विचार आहेत. त्यांच्या जीवनातील संघर्ष, त्यांच्या कवितेतील विद्रोह आणि समाजाला विचार करायला भाग पाडणारी त्यांची भूमिका पडद्यावर मांडणे हे मोठे आव्हान आहे. हा चित्रपट केवळ एका कवीची कथा नसून, तो एका चळवळीचा, एका विचारप्रवाहाचा आणि अन्यायाविरुद्धच्या लढ्याचा दस्तऐवज आहे. 'ढसाळ'च्या माध्यमातून आम्ही त्यांच्या विचारांची ज्वाला आजच्या पिढीपर्यंत पोहोचवत आहोत.

ललित प्रभाकर म्हणाला, ही भूमिका मिळाल्यावर सर्वात मोठं आव्हान होतं, नामदेव ढसाळांसारखं दिसणं. त्यासाठी दिग्दर्शिका वरुणा राणा आणि रंगभूषाकार श्रीकांत देसाई यांनी अथक प्रयत्न केले. पहिल्या लुक ट्रायलला मल्लिका नामदेव ढसाळ यांनी "अगदी असाच दिसायचा नामदेव!" असं म्हटल्यावर आम्हाला मोठा दिलासा मिळाला. या भूमिकेमुळे त्यांच्या विचारांशी आणि संघर्षाशी अधिक जवळून परिचय झाला.

रंगभूषाकार श्रीकांत देसाई म्हणाले, ज्या चित्रपटाच्या संहिता मला भावतात त्या नक्की मला करायला आवडतात. वरुणा मॅडमना भेटलो त्यावेळी त्यांनी मला संहिता आणि दादांचे जुने फोटो दाखवले. मुळात वरुणाजींनी ४-५ वर्षे ह्या विषयाचा अभ्यास केलाय. असे फार कमी दिग्दर्शक असतात. नामदेव ढसाळांना प्रत्यक्षात उतरवताना आव्हान तर होतेच पण ढसाळ म्हणजेच संघर्ष आणि हा संघर्ष प्रेक्षकांना पाहायला नक्की आवडेल.

# तन्वी कोलते ठरली 'बिग बॉस मराठी ६'ची विजेता; रितेश भाऊंनी ट्रॉफीसोबत दिली 'ही' खास भेटवस्तू

रितेश देशमुख होस्ट करत असलेला 'बिग बॉस मराठी ६' चा ग्रँड फिनाले थाटामाटात पार पडला. तन्वी कोलते 'बिग बॉस मराठी ६'ची विजेता ठरली, तर राकेश बापट उपविजेता झाला. टॉप ५ मध्ये विशाल कोटीयन, राकेश बापट, अनुश्री माने, दिपाली सय्यद आणि तन्वी कोलते होते. आता सोशल मीडियावर तन्वी कोलतेची चर्चा पाहायला मिळत आहे. विजेत्या तन्वी कोलतेला खूप भेटवस्तू मिळाल्या. ती 'बिग बॉसची क्वीन' आणि बिग बॉसच्या घरातील 'टास्क क्वीन' ठरली.

तन्वी कोलतेला 'बिग बॉस मराठी ६' ची चमकदार ट्रॉफी मिळाली. त्यानंतर तब्बल १५ लाखांचा चेक मिळाला. तसेच पु.ना.गाडगीळ आणि सन्स यांच्याकडून १० लाखांचे Voucher आणि तुनवाल ई-मोटर्सकडून ई-बाईकही मिळाली. सध्या सर्वत्र तन्वी कोलतेचे कौतुक होत आहे. तिच्यावर शुभेच्छांचा आणि प्रेमाचा वर्षाव होत आहे.

'बिग बॉस मराठी ६' ची विजेता तन्वी कोलतेला रितेश भाऊंनी देखील एक खास




भेट वस्तू दिली आहे. त्यांनी तन्वीला छत्रपती शिवाजी महाराजांचे छायाचित्र असलेली फ्रेम गिफ्ट केली आहे. जिला पाहून तन्वी खूप भावुक झाली आणि तिला आनंद झाला. रितेश देशमुखचा 'राजा शिवाजी' चित्रपट २ मे ला थिएटरमध्ये रिलीज होणार आहे. रितेशचा हा ड्रीम प्रोजेक्ट आहे. 'बिग बॉस मराठी ६' ची ट्रॉफी जिंकल्यावर तन्वी कोलतेने सर्वांचे आभार मानले. ती म्हणाली की, "१०० दिवसांनी ही ट्रॉफी माझ्या हातात आली आहे. बिग बॉसची ट्रॉफी जिंकण्याचे माझे स्वप्न होते. मी आई-बाबांना नेहमी सांगायची की मला 'बिग बॉस'मध्ये जायचे आहे. कारण हा शोमुळे आपल्याला स्वतःच्या नावाने ओळख मिळते. मी तन्वी कोलते म्हणून आले होते आणि आज तन्वी कोलते हा ब्रँड मिळवून जातेय..."

# विराटच्या मदतीला धावली 'ती' इन्फ्लुएन्सर

बॉलिवूड अभिनेत्री अनुष्का शर्माचा नवरा आणि भारतीय क्रिकेटपटू विराट कोहली पुन्हा एकदा इन्स्टाग्रामवर एका फोटोला 'लाईक' केल्यामुळे वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. गेल्या वर्षी, विराट कोहलीने टीव्ही अभिनेत्री अवनीत कौरच्या एका फोटोला 'लाईक' केले होते, यामुळे बरीच चर्चा रंगली होती. आता, या क्रिकेटपटूने जर्मन इन्फ्लुएन्सर 'LizLaz' (लिझलैज) हिने पोस्ट केलेल्या काही 'बोल्ड' फोटोंना 'लाईक' केले आहे. त्यानंतर त्याने स्पष्टीकरण दिले की, ही कृती चुकून घडली होती आणि त्याचा मुलगा 'अकाय कोहली' याच्या हातात फोन असताना हे घडले होते.



विराट कोहली सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर 'ट्रोल' होत आहे. यामुळे, ज्या इन्फ्लुएन्सरच्या फोटोला या क्रिकेटपटूने 'लाईक' केले होते, तिने आता या घटनेबाबत आपले मौन सोडले आहे. हिंदुस्तान टाइम्सशी साधलेल्या संवादात, लिझलैजने सांगितले की, विराट कोहलीने नेमक्या कोणत्या वेळी तिच्या फोटोला 'लाईक' केले किंवा त्यानंतर तो 'लाईक' काढून घेतला याबद्दल तिला काहीच कल्पना नव्हती. विशेष म्हणजे, लिझलैजला उलट विराटबद्दलच खूप वाईट वाटत आहे.


जेव्हा त्या इन्फ्लुएन्सरला विचारण्यात आले की, जेव्हा तो फोटो 'अनलाईक' करण्यात आला, तेव्हा तिला दुखावले गेल्यासारखे किंवा निराश झाल्यासारखे वाटले का? त्यावर तिने असे उत्तर दिले, "नाही, खरे सांगायचे तर, मला उलट त्याच्याबद्दलच थोडे वाईट वाटले. त्याने माझ्या फोटोला 'लाईक' केले होते, याचा मला खूप आनंद झाला होता. पण त्यानंतर, जेव्हा त्याने तो 'अनलाईक' केला, तेव्हा मला त्याच्याबद्दल थोडे वाईट वाटले. कारण, ही गोष्ट इतकी मोठी बातमी कशी बनली, हे मला अजूनही समजलेले नाही. लोकांना हे नेमके कसे लक्षात आलं? त्यांनी याला बातमीचे स्वरूप कसं दिलं? कदाचित त्याचा तसा काहीच हेतू नसावा. तरीही, मी याबद्दल कृतज्ञ आहे आणि त्याच्याकडून मला मिळालेल्या पाठिंब्याचे मी मनापासून कौतुक करते."

# ५ लाख घेण्यास नकार, दिपाली सय्यद एलिमिनेट झाल्यावर नेटकरी म्हणाले..

बिग बॉस मराठीच्या टॉप ५ राकेश बापट, तन्वी कोलते, विशाल कोटियन, अनुश्री माने व दिपाली सय्यद या स्पर्धकांपैकी आता टॉप ३ उरले आहेत. दिपाली सय्यद १०० दिवसांच्या प्रवासानंतर पाचव्या क्रमांकावर एलिमिनेट झाली. तर अनुश्री माने चौथ्या क्रमांकावर बाद झाली. फिनालेतील सर्वात मोठा ट्विस्ट म्हणजे रितेश देशमुखने पैसे घेऊन स्वतःला एलिमिनेट करण्याची ऑफर या पाच स्पर्धकांना दिली होती, पण सर्वांनीच नकार दिला. अखेर कमी मतांच्या आधारे ५ व्या क्रमांकावर बाद होणाऱ्या स्पर्धकाचं नाव रितेश देशमुखने जाहीर केलं. दिपाली सय्यद घराबाहेर पडली, त्यानंतर नेटकऱ्यांनी तिचा निर्णय व एलिमिनेशन यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत.

झालं असं की टॉप ५ पैकी टॉप ४ निवडायचे होते. त्यामुळे पाचही स्पर्धकांना होस्ट रितेश देशमुखने एक ऑफर दिली. बझर वाजवून पैशांची बॅग घेऊन बाहेर





पडायचं, अशी ती ऑफर होती. आधी ३ लाख रुपये, नंतर ४ लाख रुपये आणि शेवटी ५ लाख रुपयांची ऑफर रितेश देशमुखने दिली. पण पाचही जणांनी ती नाकारली. अखेर दिपाली सय्यद पाचव्या क्रमांकावर बाद झाली.

कलर्स मराठीच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून यासंदर्भात पोस्ट करण्यात आली आहे. या पोस्टवर नेटकऱ्यांनी दिपाली सय्यदचा निर्णय व एलिमिनेशन यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत. 'उत्तम प्रवास', 'दिपाली खूप चांगलं खेळली', 'दिपाली तू बेस्ट आहेस', 'आता तुला टीव्हीवर पाहता येणार नाही, '५ लाख घ्यायला पाहिजे होते,' 'दीपाली ताई छान खेळला तुम्ही, पण? घ्यायला पाहिजे होते सगळे घ्या म्हणत होते,' 'पैसे घ्यायला हवे होते,' '५ लाख मिळाले असते पण मोठी चूक केली,' 'आपलेच गद्दार निघाले आता तरी समज, बाहेर आल्यावर आता तरी त्यांची बाजू नको घेऊस,' अशा कमेंट्स या पोस्टवर पाहायला मिळत आहेत. एकूणच कमेंट्स पाहता प्रेक्षकांना दिपालीचा हा निर्णय फारसा पटला नाही.

दरम्यान, बिग बॉस मराठी सीझन ६ चा प्रवास दिपाली सय्यदसाठी चढ-उतारांनी भरलेला राहिला. अनेकांशी वाद झाले, भांडणं झाली, त्याचबरोबर ती घरात असताना तिच्या सासूबाईंचे निधन झालं. त्यामुळे ती त्यांना शेवटचं पाहूही शकली नाही.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कृषी क्रांतीचे नवे पाऊल! बुलढाण्यात शेतमाल प्रक्रिया उद्योग कार्यशाळा उत्साहात संपन्न



**जनसंचलन बुलढाणा**

शेतकरी उत्पादक कंपन्या () आणि शेतकरी गटांच्या आर्थिक व तांत्रिक सक्षमीकरणासाठी आयोजित करण्यात आलेली शेतमाल प्रक्रिया उद्योग आधारित कार्यशाळाफ्र सोमवार दि. २५ मे रोजी उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत परिसरातील शेकडो प्रगतशील शेतकरी, शेतकरी गटांचे प्रतिनिधी आणि कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यशाळेमध्ये चे संचालक आदित्य शहा यांनी लाल मिरची, हळद, अद्रक, तूर, मका आणि केळी यांच्या खरेदी-विक्री करार प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी शेतकऱ्यांना थेट बाजारपेठेशी जोडण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान, बाजारपेठेतील संधी आणि करार शेतीचे महत्त्व याविषयी माहिती दिली. प्रसिद्ध सीए वासुदेव कोठारी यांनी शेतकरी उत्पादक कंपन्यांची कार्यपद्धती, आर्थिक नियोजन, कायदेशीर बाबी तसेच वेळोवेळी पूर्ण करावयाच्या वित्तीय प्रक्रियांबाबत सखोल मार्गदर्शन केले. यावेळी . . चे संचालक विजय सिंग आणि कामिनी सिंग यांनी आभासी माध्यमातून सहभाग घेत शेवगा पिकाच्या आधुनिक लागवड तंत्रज्ञानाबरोबरच शेवगा पावडर निर्मिती व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील संधी यावर महत्त्वपूर्ण माहिती दिली. जिल्ह्यात वाढत असलेल्या फळपिकांच्या क्षेत्राचा विचार करता चे संचालक राजीव जावळे यांनी फळ प्रक्रिया उद्योगातील भविष्यातील संधी, मूल्यवर्धन आणि रोजगारनिर्मिती यांचे विश्लेषण केले. पोकरा प्रकल्पाच्या नोडल अधिकारी रेणुका पाटील यांनी ना.दै.कृ.सं. प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. तसेच वंदना टेकाळे यांनी भाजीपाला व औषधी वनस्पती साठवण आणि प्रक्रिया करण्यासाठी ङ्गसोलार ड्रायरफ्च्या उपयुक्ततेवर मार्गदर्शन केले. चे संचालक संतोष साखरे यांनी आपल्या कंपनीची यशोगाथा आणि हळद प्रक्रिया उद्योगातील अनुभव शेतकऱ्यांसमोर मांडत प्रक्रिया उद्योगामुळे उत्पन्नवाढ कशी साध्य झाली हे सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा प्रकल्प संचालक (आत्मा) बुलढाणा संतोषजी डाबरे होते. यावेळी प्रकल्प उपसंचालक आत्मा दिपक बुटे, कृषी उपसंचालक संजीवनी कणखर तसेच आत्मा विभागाचे गजानन चौधरी, भरत कापसे, गजानन इंगळे आणि अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंबादास खडसान यांनी तर आभार प्रदर्शन दिपक बुटे यांनी केले. अध्यक्षीय भाषणात संतोषजी डाबरे यांनी शेतकऱ्यांना पारंपरिक शेतीबरोबरच आधुनिक प्रक्रिया उद्योग स्वीकारण्याचे आवाहन करत, मूल्यवर्धित उत्पादनांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळेल, असे प्रतिपादन केले.

# नवीन कामगार संहितांवरील मसुद्याबाबत हरकती व सूचना मागविल्या

**जनसंचलन/बुलढाणा**

भारत सरकारने दि. २१ डिसेंबर २०२५ पासून नवीन चार कामगार संहिता ( ) अंमलात आणल्या आहेत. त्याअनुषंगाने राज्य शासनाने औद्योगिक संबंध संहिता-२०२०, वेतन संहिता-२०१९, व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता-२०२० तसेच सामाजिक सुरक्षा संहिता-२०२० या संहितांचे मसुदे अधिसूचनेद्वारे दि. २८ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध केले आहेत. या मसुद्यांबाबत औद्योगिक क्षेत्रातील कामगार संघटना, मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन, दुकाने व आस्थापना, मालक संघटना तसेच संबंधित घटकांनी आपल्या हरकती अथवा सूचना दि. १२ जून २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी सादर कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. हरकती अथवा सूचना कामगार आयुक्त, कामगार भवन, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ या पत्त्यावर पाठवाव्यात. तसेच .. या ई-मेल आयडीवरही सूचना पाठविता येणार आहेत.


## आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा



**बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..**

| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने \ गुंतवणुक रक्कम | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

### ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

**सुकन्या लक्षाधीश ठेव योजना**

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

## दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४



पत्रकारीतेचा धर्म आम्ही निभावणार




सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भीड जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

# खिरोडा पुलावर एचटीबीटीचा मोठा पर्दाफाश

## ८.५८ लाखांचा संशयित बोगस कापूस बियाणे साठा जप्त! तामगाव पोलिसांची धडक कारवाई; तिघांविरुद्ध गंभीर गुन्हे दाखल, एक आरोपी फरार




**जनसंचलन/ संग्रामपूर**

तालुक्यातील खिरोडा येथे अनधिकृत एचटीबीटी कापूस बियाण्यांच्या काळाबाजाराचा मोठा भांडाफोड झाला असून तब्बल ८ लाख ५८ हजार रुपयांचा संशयित बियाणे साठा जप्त करण्यात आला आहे. कृषी विभाग आणि तामगाव पोलिसांनी संयुक्त कारवाई करत ही धडक मोहीम राबवली. या प्रकरणात तिघांविरुद्ध विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून एक आरोपी फरार झाला आहे. कृषी अधिकारी तथा बियाणे निरीक्षक रविकीरण नावकार यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, जळगाव जामोद-शेगाव मार्गावरून अनधिकृत एचटीबीटी कापूस बियाण्यांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर खिरोडा येथील पूर्णा नदी पुलाजवळ सापळा रचण्यात आला. दुपारी साडेचारच्या सुमारास एमएच ३० बीडब्ल्यू ९५८५ क्रमांकाची मारुती ईको गाडी अडवून तपासणी केली असता त्यामध्ये ९ कट्ट्यांमध्ये भरलेले तब्बल ४५८ संशयित बियाण्यांचे पाकिटे आढळून आली. -२, ५फ आणि ४ २०:२०फ या नावाने विक्रीसाठी आणलेली ही बियाणे पाकिटे शासनमान्य नसल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे या पाकिटांवर उत्पादक, वितरक, किंमत, जीईएसी मान्यता क्रमांक यासारखी अत्यावश्यक माहितीच नव्हती. शेतकऱ्यांची फसवणूक करून जादा दराने विक्रीसाठी हा माल आणल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कारवाईत गुलाबराव ठाकरे, शंकर दांदळे यांना ताब्यात घेण्यात आले असून विनोद पाटील उर्फ वाघमारे हा आरोपी फरार झाला. जप्त बियाण्यांचे नमुने नागपूर येथील प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत

# अॅड. शर्वरी तुपकर यांचा आक्रमक पवित्रा रात्री ११ वाजता धाडच्या पेट्रोल पंपावर धडक देत अखेर शेतकऱ्यांना डिझेल द्यायलाच भाग पाडले..!

**जनसंचलन/धाड**




गेल्या तीन दिवसांपासून डिझेल उपलब्ध असूनही शेतकऱ्यांना ताटकळत ठेवण्यात येत होते. खरिपाचा हंगाम तोंडावर असताना ट्रॅक्टरच्या दोन-दोन किलोमीटर रांगा लागल्या होत्या. रात्री उशिरापर्यंत शेतकरी डिझेलच्या प्रतीक्षेत उभे असताना पंप प्रशासन आता डिझेल मिळणार नाही म्हणत शेतकऱ्यांना परत पाठवत होते. माहिती मिळताच अॅड. शर्वरी रविकांत तुपकर यांनी थेट पेट्रोल पंपावर धडक देत पंप चालक, कर्मचारी आणि संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला. सुरुवातीला मुजोरी करणाऱ्या प्रशासनाला अखेर नमते घ्यावे लागले आणि प्रशासकीय हस्तक्षेपानंतर रात्री ठीक १२ वाजता डिझेल वाटप सुरू करण्यात आले. त्यामुळे शेकडो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. खरिपाच्या तोंडावर बळीराजाला डिझेलसाठी वणवण भटकायला लावणाऱ्यांची मुजोरी सहन केली जाणार नाही,फ्फ असा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बंडू उर्फ समाधान नागवे, आकाश माळोदे, गजानन नाईकवाडे यांच्यासह परिसरातील शेकडो शेतकरी उपस्थित होते.

# मी शेंदूरजनचा आहे म्हणणारे वृद्ध बाबा सिव्हिलमध्ये दाखल; नातेवाईकांचा शोध सुरु!

**जनसंचलन/बुलढाणा**



शहरात माणुसकीचे हृदयस्पर्शी दर्शन घडवणारी घटना समोर आली आहे. कडक उन्हामुळे त्रस्त झालेल्या एका वृद्ध बाबांना अत्यंत गंभीर अवस्थेत हॉस्पिटलसमोर बसलेले पाहून नागरिकांनी तत्काळ मदतीचा हात पुढे केला. शहरातील नयन मंदिर ऑप्टिकलजवळ हे वृद्ध बाबा अशक्त अवस्थेत आढळून आले. याबाबत ममता महाजन मॅडम यांनी माहिती देत तातडीने मदतीचे आवाहन केले. ममता महाजन यांनी स्वतः त्या वृद्धांना पाणी व जेवण देऊन आधार दिला. मात्र बाबांची प्रकृती अत्यंत खालावलेली असल्याने सेवा तर्फे त्वरित रेस्क्यू मोहीम राबवून त्यांना सिव्हिल हॉस्पिटलच्या मध्ये दाखल करण्यात आले. विशेष म्हणजे, हे बाबा व्यवस्थित बोलू शकत नव्हते, चालण्याचीही त्यांची ताकद संपली होती. त्यांनी मागील तीन ते चार दिवसांपासून काहीही अन्न खाल्ले नसल्याची माहिती दिली. बाबांच्या म्हणण्यानुसार ते शेंदूरजन येथील असून त्यांचे कोणीही नातेवाईक नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. त्यामुळे जनहितार्थ आवाहन करण्यात येत आहे की, जर कोणाला हे वृद्ध बाबा ओळखीचे वाटत असतील तर त्यांनी तातडीने सिव्हिल हॉस्पिटल प्रशासनाशी संपर्क साधावा. माणुसकी जपण्यासाठी समाजाने पुढे येण्याची गरज असल्याची भावना यानिमित्त व्यक्त होत आहे.

# लग्नाहून परतताना काळाची झडप! पत्रकाराच्या तरुण मुलाचा भीषण अपघातात मृत्यू; मित्र गंभीर जखमी

**जनसंचलन/बुलढाणा**



लग्न समारंभ आटोपून आनंदाने घरी परतणाऱ्या तरुणांवर काळाने अचानक घाला घातला. धाड नाक्याजवळ नांद्राकोळी रस्त्यावर झालेल्या भीषण अपघातात २६ वर्षीय मंगेश दिगांबर कंकाळ याचा जागीच मृत्यू झाला, तर त्याचा मित्र विजय दगडूबा जिने (वय २४) गंभीर जखमी झाला आहे. मंगेश हा परिसरातील पत्रकार तथा ङ्गशब्द लेखफ साप्ताहिकाचे मुख्य संपादक दिगंबर कंकाळ यांचा मुलगा असल्याने पत्रकार वर्तुळात मोठी हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगेश आपल्या दोन मित्रांसह एका लग्नसमारंभासाठी गेला होता. समारंभ आटोपून ते स्प्लेंडर दुचाकीने ( २८ २०८०) घरी परतत असताना २७ मे रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की मंगेशचा जागीच मृत्यू झाला. घटनास्थळी नागरिकांनी धाव घेत जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. विजय जिने याच्यावर उपचार सुरू असून तिसऱ्या मित्राला किरकोळ दुखापत झाली आहे. पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली असून पुढील तपास सुरू आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८